UGC - CARE LISTED

ISSN: 0974 - 8946

अनुसन्धान-प्रकाशन-विभागीया त्रैमासिकी शोध-पत्रिका

18-19

# शोध-प्रभा

(A Reffered & Peer-Reviewed Quarterly Research Journal)

Vol. 44, Issue. 01, No.01 : 2019

प्रधानसम्पादकः
**प्रो.मुरलीमनोहरपाठकः**
कुलपतिः

सम्पादकः
**प्रो.शिवशङ्करमिश्रः**

सहसम्पादकः
**डॉ.ज्ञानधरपाठकः**

**श्रीलालबहादुरशास्त्रीराष्ट्रियसंस्कृतविश्वविद्यालयः**
केन्द्रीयविश्वविद्यालयः
नवदेहली-16

18-19


UGC- CARE Listed ISSN : 0974-8946

अनुसन्धान-प्रकाशन-विभागीया त्रैमासिकी शोध-पत्रिका

# शोध-प्रभा

(A REFERRED & PEER- REVIEWED QUARTERLY RESEARCH JOURNAL)

45 वर्षे तृतीयोऽङ्कः (जुलाईमासाङ्कः) 2020 ई.

प्रधानसम्पादकः

**प्रो.रमेशकुमारपाण्डेयः**

कुलपतिः

सम्पादकः

**प्रो.शिवशङ्करमिश्रः**

शोधविभागाध्यक्षः

सहसम्पादकः

**डॉ.ज्ञानधरपाठकः**

शोधसहायकः

**श्रीलालबहादुरशास्त्रीराष्ट्रियसंस्कृतविश्वविद्यालयः**

नवदेहली-110016

| | | |
|---|---|---|
| 18 | **A STUDY ON INVESTMENT BEHAVIOUR OF WOMEN INVESTORS IN THOOTHUKUDI CITY**<br>Dr. A. ARUNACHALA RAJAN, Mrs. G. MABEL GRANAPU | 101 |
| 19 | **A STUDY ON CUSTOMER SATISFACTION OF BANKING SECTOR IN THIRUVARUR**<br>Dr.J.Kannan | 105 |
| 20 | **CLUSTERING OF CANCER DATASET TO IDENTIFY THE RISK OF SEVERITY IN PATIENT TO TAKE IMMEDIATE TREATMENT**<br>V. SRINIVASAN, K.SELVANAYAKI, M. ARUNA | 110 |
| 21 | **ANALYSING SCIENCE FICTION: AN AMALGAMATION OF MYTHOLOGY AND TECHNOLOGY**<br>Dilip K Madhesiya, Aayush Roy Mallik | 115 |
| 22 | **ROLE OF WOMEN: AN INVESTIGATION OF MAHESH DATTANI'S PLAY *TARA***<br>Dilip K Madhesiya, Shelly Sharma | 120 |
| 23 | **A NOTE ON READER RESPONSE ANALYSIS OF "HANSEL AND GRETEL"**<br>Dilip K Madhesiya, Ishu Singh | 127 |
| 24 | **DECODING THE IMPACT OF BURMA AND INDIAN CULTURESIN AMITAV GHOSH'S 'THE GLASS PALACE'**<br>P.Malarselvi, Dr.S.Subramanian | 135 |
| 25 | **BORDER TRADE AND ACT EAST POLICY: ITS PROSPECTS AND PROBLEMS IN NER**<br>Parismita Dutta, Biraj Das | 140 |
| 26 | **IDENTITY CRISIS IN ARAVIND ADIGA'S NOVEL "THE WHITE TIGER"**<br>Dr. J. JOSEPHINE | 149 |
| 27 | **IN SEARCH OF A NATIONAL IDENTITY: JAMAICA KINCAID'S *A SMALL PLACE* AS A CRITIQUE OF THE TOURISM INDUSTRY IN ANTIGUA**<br>Sambhu R, Namratha P Kini | 153 |
| 28 | **माध्यमिक स्तर पर उच्च स्तरीय चिंतन कौशल युक्त विद्यार्थियो की सृजनात्मकता का अध्ययन करना**<br>डॉ. अमी राठौड़ श्रीमती राखी जीनगर | 160 |
| 29 | **SUPPLYCHAINMANAGEMENT ININDIAN PHARMACEUTICAL INDUSTRY**<br>Prof. Ajit Sane, Prof. Ashok Shukla, Prof. Joel Das, Prof. Mritunjay Kumar, Prof. Animesh Kumar | 167 |
| 30 | **आंबेडकरी जलसा : आंबेडकरी चळवळीचे एक ऐतिहासिक साधन**<br>प्रा. डॉ. संघमित्रा विठ्ठलराव सरवदे | 171 |

ISSN: 0974-8946
Vol. 44, Issue. 01, No.1: 2019

# आंबेडकरी जलसा : आंबेडकरी चळवळीचे एक ऐतिहासिक साधन

**प्रा. डॉ. संघमित्रा विठ्ठलराव सरवदे** सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग मा. श्री. अण्णासाहेब डांगे महाविद्यालय, हातकणंगले जि. कोल्हापूर

**गोषवारा:**
'आंबेडकरी जलसा' हा लोकसाहित्याचा प्रकार आहे. त्याची निर्मिती महाराष्ट्राच्या लोकप्रिय 'तमाशा' या लोककला प्रकारातून झाली आहे. प्रचलित तमाशा या प्रकारामध्ये काही प्रबोधनात्मक बदल करून सत्यशोधकी जलसे व आंबेडकरी जलसे निर्माण झाले. या कला प्रकाराचा हेतु मनोरंजनातून प्रबोधन करणे हा आहे.
या जलशात तत्कालीन राजकीय, धार्मिक व सामाजिक लढ्याचे चित्रण आले आहे. या चित्रणात दाहकता, भेदकता व वास्तविकता आली आहे. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील अस्पृश्यांच्या मुक्ती लढ्याचे स्वरूप कसे होते, त्यांची आयुधं कोणती होती आणि ती कशी व किती प्रभावी होती याचा शोध जलशांमधून घेता येतो. लोकसाहित्याच्या अभ्यासकाबरोबरच इतिहास अभ्यासकालाही यातून नवी संशोधन दृष्टी मिळू शकते. सबाल्टर्न गटात मोडणाऱ्या दलितांचा इतिहास लिहित असताना गैर पारंपारिक साधनांचा, वाङ्मय, लोककथा, लोकगीते, मुलाखती अशा मौखिक साधनांचा वापर आवश्यक ठरतो. आंबेडकरी जलसा स्थापनेचा शुद्ध हेतू हा आंबेडकरी विचारांचा व चळवळीचा प्रचार प्रसार करणे हा होता. म्हणून जलसा हे आंबेडकरी चळवळीचे एक महत्त्वपूर्ण साधन होऊ शकते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या सामाजिक, धार्मिक व राजकीय वैचारिक चळवळी चालवल्या त्या विचारांचा प्रचार व प्रसार करण्याचे महत्त्वाचे कार्य तत्कालीन जलसाकारांनी मोठ्या हिरीरीने व प्रभावी पद्धतीने पार पाडले आहे. या ललित कला प्रकाराचा तत्कालीन समाजावर खूप मोठा प्रभाव झालेला दिसून येतो.
हे एक सबाल्टर्न इतिहास लेखनाचे मोठे साधन होऊ शकते म्हणून येथे त्याची एक ऐतिहासिक साधन या अंगाने चिकित्सा केली आहे. तसेच, कलेच्या अंगाने इतिहास लिहित असताना तत्कालीन आंबेडकरी विचाराने प्रेरित होऊन ज्या जलसाकारांनी या कलेच्या विकसित केलेल्या अभिव्यक्तीचे व दिलेल्या योगदानाचे महत्त्व विशद केले आहे.

**की वर्ड्स:**
आंबेडकरी जलसा, तमाशा, वग-नाट्य, आंबेडकरी चळवळ, मौखिक साधने, सबाल्टर्न इतिहास, लोकसाहित्य.

**प्रस्तावना:**
आंबेडकरी जलसा हा लोकसाहित्याचा प्रकार आहे. त्याची निर्मिती महाराष्ट्राची लोकप्रिय 'तमाशा' या लोककला प्रकारातून झाली आहे. प्रचलित तमाशा या प्रकारामध्ये काही प्रबोधनात्मक बदल करून सत्यशोधकी जलसे व आंबेडकरी जलसे निर्माण झाले. या कला प्रकाराचा हेतु मनोरंजनातून प्रबोधन करणे हा आहे.
डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या सामाजिक, धार्मिक व राजकीय वैचारिक चळवळी चालवल्या त्या विचारांचा प्रचार व प्रसार करण्याचे महत्त्वाचे कार्य तत्कालीन जलसाकारांनी मोठ्या हिरीरीने व प्रभावी पद्धतीने पार पाडले. या ललित कला प्रकाराचा तत्कालीन समाजावर खूप मोठा प्रभाव झालेला दिसून येतो. त्याची एक ऐतिहासिक साधन म्हणून चिकित्सा करणे क्रमप्राप्त आहे. हे सबाल्टर्न इतिहास लेखनाचे मोठे साधन होऊ शकते.
लोकसाहित्याचे अभ्यासक गंगाधर मोरजे आपल्या 'लोकसाहित्य: बदलते संदर्भ; बदलती रूपे' या ग्रंथात म्हणतात, "लोककलांमध्ये झालेल्या बदलाची नोंद लोकसाहित्याच्या अभ्यासकांना घ्यावी लागते. लोकसाहित्य जीवन संदर्भानुसार आपली आविष्काराची रूपे बदलत असते. लोकसाहित्याच्या आविष्काराचे एक अंग म्हणजे लोककला होय. लोकसाहित्य व लोककला यांच्या अभ्यासाची साधन सामग्री सारखीच असली तरी दोहोंच्या प्रकटीकरणाचा हेतू भिन्न असल्यामुळे लोकसाहित्याच्या अभ्यासकांनी त्याची नोंद घेणे आवश्यक असते. नव्या संदर्भात लोकसाहित्याच्या क्षेत्रीय तपशीलवार निरीक्षणातून संहिता, संदर्भ, सादरि करणासह अभ्यास होणे आवश्यक ठरत आहे. या सर्व गोष्टीच्या योग सिद्धीसाठी नवी संशोधन दृष्टी, क्षेत्रीय अभ्यास, त्याचे उपयोजन करण्याचे जाणीवपूर्वक शिक्षण घेणे आवश्यक आहे."[१] लोकसाहित्याच्या अभ्यासकाबरोबरच इतिहास अभ्यासकालाही यातून नवी संशोधन दृष्टी मिळू शकते. सबाल्टर्न गटात मोडणाऱ्या दलितांचा इतिहास लिहित असताना गैर पारंपारिक साधनांचा, वाङ्मय, लोककथा, लोकगीते, मुलाखती अशा मौखिक साधनांचा वापर आवश्यक ठरतो.[२]

तमाशांमध्ये काम करणारे कलावंत हे मोठ्या प्रमाणावर महार, मांग, डोंबारी व कोल्हाटी या जातीचे असत. महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांतून प्रेरणा घेऊन आंबेडकरी जलसा हा सामाजिक प्रबोधनाच्या विचाराने प्रेरित झालेल्या लोककलेचा प्रकार विकसित झाला. जलसा हे शुद्ध आंबेडकरी विचार आणि तत्त्वज्ञानाची बांधिलकी मानणारे लोकनाट्याचे रूप आहे. इतिहासाचे संदर्भ साधन म्हणून जलशाकडे बघत असताना संहिता संदर्भ व सादरीकरण या दोन्ही अंगाने त्याचा विचार होणे गरजेचे आहे. तमाशाच्या मुळ संहितेच्या आशयात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे सूत्र घालून जलशाची निर्मिती केली गेली. महार लोकांना तमाशात काम करणाऱ्याची पार्श्वभूमी होतीच. त्यांना सादरि करणाची कला देखील अवगत होती. त्यामुळे या जलशांनी बाबासाहेबांच्या क्रांतीचा नवा विचार घरा-घरातून पसरविला. ते सामाजिक चळवळ गतिमान करणारे प्रभावी माध्यम ठरले.

**व्याख्या:**

डॉ. शरण कुमार लिंबाळे यांच्या मते, "चळवळीची प्रेरणा घेऊन कार्यकर्त्या कलावंतांनी सादर केलेली लोककला म्हणजे जलसा होय!"[३] आंबेडकरी चळवळीचे जेष्ठ अभ्यासक आप्पासाहेब रणपिसे यांनी आंबेडकरी जलशाची सादरि करणाच्या अंगाने एक व्याख्या अशी केली आहे की, "प्रथम वाद्य, संगीत, बाजा झाल्यावर संगीत ऐवजी प्रारंभी भीम वंदना म्हणून सरळ सोप्या भाषेत विनोदी विरोधाभासाची डूब घेऊन घरगुती जाणि वेतून समाजप्रबोधन करणारे, नाचणाऱ्या नाचीशिवाय वात्रटपणा नसणारे नव-तमाशे म्हणजे आंबेडकरी जलसे होय."[4] रणपिसे पुढे म्हणतात, "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्य-कर्तृत्वाचा विचार व तत्त्वज्ञानाचा, आदेश आणि संदेशाचा सुलभ अन्वयार्थ गीत व संगीताद्वारा अभिनित होणारा लोकनाट्य आविष्कार म्हणजे आंबेडकरी जलसे होत."[५] जलसाकारांजवळ संगीताची जाण होती, फार्स लेखन, संवाद लेखन व अभिनयाचे कसबही होते.

**आंबेडकरी जलशाची जन्म कथा:**

समाज जागृतीचे काम सोपे नव्हते. या संदर्भात जलसाकार भीमराव कर्डक यांनी आपला अनुभव विशद केला आहे. "काळाराम मंदिर सत्याग्रहाच्या काळात बाबासाहेबांची सभा नाशिकच्या महारवाड्यात झाली. या सभेत त्यांनी अस्पृश्य तरूणांना सामाजिक कार्यात वाहून घेण्याचे आवाहन केले. या आवाहनाने प्रेरित होऊन कर्डकांनी 'नाशिक जिल्हा युवक संघ' नावाची संघटना २६ ऑक्टोबर, १९३० रोजी स्थापन केली. या संघटने मार्फत संपूर्ण जिल्हाभर बाबासाहेबांच्या विचारांचा प्रचार प्रसार केला. कर्डक मुंबई येथे परतले तेथे त्यांनी बाबासाहेबांच्या विचारांचा प्रचार प्रसार करण्यासाठी समाजाच्या बैठका व सभा घेण्याचा प्रयत्न केला. पण त्यांना चांगला अनुभव आला नाही. परंपरेचा संस्कार झालेला समाज सहजासहजी बदलत नव्हता. त्यांनी बोलावलेल्या मिटिंगांना समाज प्रतिसाद देत नव्हता. त्यांनी एकदा अशीच समाजाची मिटींग बोलावली या मिटींगलाही प्रतिसाद मिळाला नाही. कंटाळून ते जवळच असलेल्या गांगुर्डे यांच्या हॉटेलात चहा पिण्यासाठी गेले. त्या वेळी गांगुर्डे म्हणाले की, आज जर तमाशा असला असता तर पाच वाजल्यापासून जागा अडवण्यासाठी लोकांची वर्दळ असती. माणसे तमाशाला जमतात सभा मिटींगसाठी नाही. तेव्हा कर्डक यांनी सत्यशोधक जलशाच्या धर्तीवर दलित जाणिवांचे जलसे उभे करावयाचा निश्चय केला व नाशिक जिल्हा युवक संघ संगीत जलसा मंडळाची स्थापना दादर, मुंबई येथे केली.[६] म्हणजे जलसा स्थापनेचा शुद्ध हेतू हा आंबेडकरी विचारांचा व चळवळीचा प्रचार प्रसार करणे हा होता. म्हणून जलसा हे आंबेडकरी चळवळीचे एक महत्त्वपूर्ण साधन होऊ शकते.

**आंबेडकरी जलसाकार:**

आंबेडकरी जलसा लोकसाहित्याच्या नाट्य संहितेच्या प्रकारात मोडतो. आद्य जलसाकार भीमराव कर्डक, शंकर पवार, केशव सुका आहिरे, रामचंद्र नामदेव सोनवणे, पांडुरंग गोविंद पवार, रामचंद्र गोविंद अडागळे, दिनकर भिमाजी भोसले, शिवराम सावळाराम गडकरी, जगताप, भालेराव, पांडुरंग के. सावळे, संभाजी अडसूळ, के. जी. आहिरे, केरूजी घाडगे, लऊळकर बंधू, एम. के. कांबळे, धोंडीराम यशवंत निकम, सद्गुरू अर्जुन लोखंडे, केरूबा गायकवाड, अर्जुन हरी भालेराव, जगताप-निरभवणे, खंडोबा धायरीकर, नामदेव सदाशिव अहिरे, रावजी सावळाराम गडकरी, बाबुराव घोलप, विक्रम भालेराव, बाजी अण्णा बनसोडे, इ. जलसाकार आढळतात. या जलसाकारांचे वग-नाट्य, फार्स, तमाशे आदि पुस्तक रुपाने आज उपलब्ध नाहीत. हे साहित्य मोठ्या प्रमाणात मौखिक होते. त्यांचे काही प्रमाणात संकलन करून 'आंबेडकरी जलसे स्वरूप व कार्य', अभिनव प्रकाशन, मुंबई हे पुस्तक भीमराव कर्डकांनी

ISSN: 0974-8946
Vol. 44, Issue. 01, No.1: 2019

लिहिले आहे. ज्या पुस्तकात किसन फागुजी बंदसोडे, कांबळे, वाघमारे, कर्डक, आहिरे, इ. कलावंतांची नावे आढळतात. हे लोक रोजच्या पोटा पाण्याचा कामधंदा करूनच सामाजिक जागृती, प्रचार व प्रसाराचे कार्य मोठ्या पोटतिडकीने आपल्या फार्स, वग-नाट्य, जलशांद्वारा करत असत.[७]

**जलशाचे विषय व सादरीकरण :**

सामाजिक सुधारणा, जागृती, राजकीय सामाजिक हक्कांची जाणीव या जलशांमध्ये ओतप्रोत भरलेली असे. महाडचा सत्याग्रह, नाशिकचा काळाराम मंदिर सत्याग्रह या ऐतिहासिक घटनांपासून ते महार वतन गुलामगिरीची प्रथा नष्ट करणारे तसेच अन्याय-अत्याचारा विरुद्ध विद्रोह, बंडाचे उत्स्फूर्त आव्हान देणारे, सारे समाजमन चेतवणारे नाट्य-सामर्थ्य त्यांच्या जलशात असे. खटकेबाज संवाद, उत्स्फूर्त विनोद, सवाल जवाब यातून विषयाचे नेमके व अचूक निरूपण केले जाई. जलसाकारांचा विषय हा की, त्यांच्या या नाटकात पारंपारिक देवधर्मावरील विषयांऐवजी आंबेडकरी चळवळीचा सामाजिक व राजकीय आशयच अधिक भरलेला असे. बंडाची आव्हानात्मक भाषा हे त्याचे स्वरूप होते. बाबासाहेब आंबेडकरांच्या महानिर्वाणापर्यंत या जलसाकारांचे चैतन्य सूर ऐकू येत होते, आज ते खंडीत झाल्याचे जाणवते.[८]

गण, गौळण, बतावणी आणि वग-नाट्य हे तमाशा रंगभूमीचे चार घटक. यामधील पारंपारिक व पौराणिक आशय टाकून देऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार आणि कार्याचा आशय घेऊन जलसाकारांनी जलशांचे सादरीकरण केले. पारंपारिक तमाशांमध्ये गणेश स्तवनाने सुरुवात व्हायची त्याऐवजी आंबेडकरी जलशांची सुरुवात भीम-स्तुतिने होण्याने सुरू झाली. या संबंधात आंबेडकरी जलसाकार भीमराव कर्डक म्हणतात, त्यांनी त्यांच्या लहानपणी ४थी - ५वीत असताना आपल्या गावी कसबे सुकेणे येथे सत्यशोधक जलसे पाहिले होते. या संदर्भात ते म्हणतात, “जर सत्यशोधक मराठा समाज गणपतीचा नामोच्चार कार्यारंभी करीत नाही तर आम्ही अस्पृश्यांना ज्या हिंदू समाजाने शूद्र म्हणून सवर्ण हिंदू समाजापासून तुटक केले, बहिष्कृत म्हणून संबोधले त्या त्यांच्या गणपतीला आम्हाला काय चाटायचे आहे ?” म्हणून जलशाच्या प्रारंभी स्तवन म्हणून मी डॉ. आंबेडकरांवरची गीत रचना केली.

“हे भीमराया, नमितो पाया। द्यावी मती आम्हा तव गुण गाया।
जगी आम्हा नाही वाली। तूच आमुची कृपा साऊली, अस्पृश्यांची खरी माऊली।
दलितांना उद्धाराया द्यावी मती। आम्हा तव गुण गाया।।”[९]

**जलशातील सामाजिक व राजकीय संदर्भ:**

खालील कवनांतून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांप्रति त्यांची निष्ठा दिसून येते. समाजप्रबोधनाच्या चळवळीशी दलित समाजाची प्रत्यक्ष कार्यनिष्ठाही त्यातून दिसून येते.

‘बाबासाहेबांचे आम्ही सच्चे भक्त। तत्त्वे त्यांचीच पाळीत आलो फक्त।
समाजासाठी सांडू आमचे रक्त। सोडून संसार प्रपंच बनू विरक्त’।।[१०]

केरुजी अर्जुन घेगडे या जलसाकारांनी त्या काळाच्या राजकारणावर लिहिले आहे की,

‘हिन्दी राजकारणाच्या बाजारी | निघाली काँग्रेसची वृद्ध नारी |
हटवादी ती भारी असे | अहिंसेचे तिला भरले पिसे |
तत्त्व हुकली मार्ग चुकली | स्वराज्य मिळेल कैसे’ ||

घेगडे यांनी काँग्रेसच्या तत्त्व हुकलेल्या राजकारणावर जसे बोट ठेवले तसे हिंदू महासभा (हिंदुत्वाचे भरले पिसे), मुस्लिम लीगने देखील पाकिस्तान निर्मितीचा हट्ट धरून स्वराज्य निर्मितीच्या प्रक्रियेत खीळ घातली. त्यांच्याही स्वार्थी धर्म वृत्तीचा समाचार घेगडे यांनी घेतला आहे.[११]

रतन दला जाधव या जलसाकारांनी दलितांच्या दारुण स्थितीचे वर्णन केले आहे.

‘आज कितिक वर्षांपासून | धर्म-रूढीने ठेविले डांबून सर्व दलितांना |
गावाबाहेर केर जसा पडला | किंमत नव्हती महारा-मांगाला |
माणुसकीचा हक्क नव्हता त्याला | गुलामगिरी बेडी होती कर्माला |
गुलाम बनवून ठेवले सर्वांना | जी जी जी’ ||[१२]

केरुबुवा गायकवाड मूळचे मराठवाड्यातील रेशम सांगवी या गावचे. त्यांनी शाळेचा वग लिहिला.

‘विद्येवाचून जगात नाही थोर | विद्या शिकून जग गेलं म्होरं |
आम्ही असेच मागे राहणार | विद्या पावून माणूस होणारं |

ISSN: 0974-8946
Vol. 44, Issue. 01, No.1: 2019

विद्या नसल्यावर म्हणतील ढोरं | त्याला माणूस कोण म्हणणारं |
घरात जाती कुत्री मांजर | आम्हा उभे करती लांब दूर |
असे दूर कुठंवरी राहावे | भीम नाम मुखामध्ये घ्यावे' ||[१३]

सन १९३७ मध्ये स्थापन केलेला मजूर पक्ष विसर्जित करून डॉ. आंबेडकरांनी १७ सप्टेंबर १९४२ रोजी अखिल भारतीय फेडरेशनची स्थापना केली. भीमराव कर्डक यांनी श्येड्युल्ड कास्ट फेडरेशनच्या प्रसार प्रचारासाठी फार्स तयार केला.

'चला स्थापू आता शाखा दलित फेडरेशन | करूनी प्रचार एक विचार लढवू राजकारण'|

या फार्समधून नवा पक्ष का स्थापला गेला, आधीचा स्वतंत्र मजूर पक्ष का विसर्जित केला, इ. शंकांचे समाधान या फार्समधून केले. जनता साप्ताहिकाच्या मदती करिता एक फार्स कर्डकांनी रचून त्यामधून वृत्तपत्राचे महत्त्व अस्पृश्य जनतेस पटवून दिले. त्यांनी जलशाचा एक प्रयोग जनता साप्ताहिकाच्या मदतीसाठी दामोदर हॉल, परळ या थिएटरमध्ये तिकिट लावून केला. या प्रयोगाचा खर्च वजा जाता रोख रुपये ५१ जनता साप्ताहिकास मदत दिली. जलसाकारांनी चळवळीस आर्थिक बळही दिले. जलसाकारांनी तयार केलेल्या फार्सच्या लिखित संहिता फारशा उपलब्ध नाहीत. हे फार्स वाचण्यापेक्षा त्याचे प्रत्यक्ष सादरीकरण पाहणे हेच अधिक प्रभावी ठरते. या जलशातील कलावंत इतक्या अस्सल स्वरुपाचे होते की, ते सहज स्वाभाविक अभिनय व संवाद कौशल्याने आणि गीत, संगीत गायन व विनोद नैपुण्याने जलसा पहाणाऱ्या शेकडो प्रेक्षकांना क्षणांत पोटात दुखे पर्यंत हसवित तर दुसऱ्या क्षणी हुंदके देत रडवित. त्यांच्या बोलण्याची लकब, हाव-भाव आणि नक्कल पहाणारे एकाच वेळी आत्मविस्मृती आणि आत्मशोध अशा दोन अवस्था प्राप्त करीत.[१४] अशा तऱ्हेने जलशाचा आशय व सादरि करणाच्या प्रभावी माध्यमातून आंबेडकरी चळवळीचा प्रसार आणि प्रचार झाला. म्हणून जलसा या प्रकाराकडे आंबेडकरी चळवळीचे साधन म्हणून पाहिले पाहिजे.

### जलसाकाराच्या संदर्भात आंबेडकरी चळवळीच्या अभ्यासकांची मते:

खुद्द डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भीमराव कर्डक आणि मंडळीचा जलसा पाहून, "माझ्या दहा सभा, मिटिंगा आणि कर्डक व मंडळीचा एक जलसा बरोबर आहे." असे गौरवोद्गार काढले होते.

आंबेडकरी चळवळीचे अभ्यासक अर्जुन डांगळे म्हणतात, "१९३०च्या पुढे प्रामुख्याने आंबेडकरी जलसाकार आणि आंबेडकरी जाणि वेचे कवी शाहीर दिसतात. त्यांनी त्या काळात ज्या रचना केल्या कलाकृती सादर केल्या त्या मुख्यत्त्वे बाबासाहेब आंबेडकरांच्या भाषणात जे संदेश यायचे, जे समाजकारण व राजकारण करीत त्याला सर्व सामान्य जनतेपर्यंत पोहोचवण्याचे काम या कलावंतांनी केले.[१५]

दलित साहित्याच्या दुसऱ्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून बोलताना प्रा. गं. भा. सरदार म्हणतात, "दलित मुक्ती आंदोलनाची सांस्कृतिक आघाडी असे दलित साहित्याचे स्थान आहे व त्यातच खरे बळ आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आंबेडकरी चळवळीचा प्रारंभ केल्यापासून त्यांची तत्त्व प्रणाली आधारास घेऊन पदे, पोवाडे, कथा, वग, लेख, आदि साहित्य निर्माण होत आलेले आहे. या साहित्याची कामगिरी नि:संशय मोलाची आहे.[१६]

योगिराज वाघमारे म्हणतात, "जलसा हे दलित साहित्याच्या अगोदरचं फार महत्त्वाचं समाज-जागृतीचे साधन होते. आंबेडकरी चळवळीचं खरं लोण त्यांनी मनोरंजनातून लोकांपर्यंत पोहचवलं."[१७]

### इतिहासाचे साधन म्हणून जलशाचे महत्त्व:

इतिहास अभ्यासकाला जलशातून अस्पृश्य समाजाच्या तत्कालीन स्थिती व गतीचे चित्रण मिळते. तसेच, जलशांमधून तत्कालीन सामाजिक, धार्मिक, आर्थिक व राजकीय लढ्याची माहिती, २०व्या शतकातील अस्पृश्यांच्या मुक्ती लढ्याचे स्वरूप, त्याबरोबरच हा लढा लढण्यासाठी ज्या लोकांनी योगदान दिले त्यांची माहितीदेखील मिळते. कोणत्याही समाजाचा इतिहास सिद्ध करावयाचा असला म्हणजे त्या समाजाच्या जीवनदृष्टीचा, श्रद्धा संकेतांचा, मनोव्यवस्थांचा, व त्यांच्या धारणांचा अभ्यास करावा लागतो या अंगानेही दलित समाजाचा व त्यांच्या चळवळींचा अभ्यास करण्यासाठी जलशांची मदत होते. कलेच्या अंगाने इतिहास लिहित असताना या जलसाकारांचे कलेच्या क्षेत्रात विकसित केलेल्या अभिव्यक्तीचे तंत्रही लक्षात येते.

### निष्कर्ष:

1) आंबेडकरी चळवळीच्या इतिहासाचे साधन म्हणून जलशाचा अभ्यास व्हावयास पाहिजे.

ISSN: 0974-8946
Vol. 44, Issue. 01, No.1: 2019

जलसे आंबेडकरांच्या जीवित कार्याची कोरीव लेणीच आहे.

2) या जलशात तत्कालीन राजकीय, धार्मिक, सामाजिक लढ्याचे चित्रण आले आहे. या चित्रणात दाहकता, भेदकता व वास्तविकता आली आहे.

3) विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील अस्पृश्यांच्या मुक्ती लढ्याचे स्वरूप कसे होते, त्यांची आयुधं कोणती होती आणि ती कशी व किती प्रभावी होती याचा शोध जलशांमधून घेता येतो.

4)

**संदर्भः**

1) कालभूत पुरुषोत्तम, लोकसाहित्याचे स्वरूप आणि विवेचन, विजय प्रकाशन नागपूर पहिली आवृत्ती २००७ पृ. १३
2) कोठेकर शांता, इतिहास तंत्र आणि तत्त्वज्ञान, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर, पृथमावृत्ती, २००५, पृ. २४५
3) लिंबाळे शरण कुमार, आंबेडकरी जलसा-लोकायन (लोककला साहित्य संमेलन) विशेषांक, संपा. - वरखेडे रमेश नाशिक, १९९५, पृ.११८
4) ठाकुर भगवान, आंबेडकरी जलसे, सुगावा प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती, २००५, पृ.९७.
5) उपरोक्त, पृ.९८
6) उपरोक्त, पृ. १०२
7) मेश्राम योगेंद्र, दलित साहित्य : उद्गम आणि विकास, श्री मंगेश प्रकाशन नागपूर, प्रथम आवृत्ती, १९९८, पृ. २३६
8) उपरोक्त, पृ. २३६
9) ठाकुर भगवान, आंबेडकरी जलसे, सुगावा प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती २००५, पृ.३९७
10) कित्ता, पृ. १३३
11) कित्ता, पृ. २१७,२१८
12) कित्ता, पृ. २२९
13) कित्ता, पृ. २४०
14) कित्ता, पृ. ४०८
15) संपादक कर्णिक मधु मंगेश, सांस्कृतिक महाराष्ट्र, १९६० ते २०१०, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ मुंबई, प्रथम आवृत्ती, २०११, पृ.३०३
16) संपा. सातपुते पोपट, शेळके भास्कर, कसबे मिलिंद, चळवळ आणि साहित्य, म. रा. लामखडे गौरव ग्रंथ, शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर, पहिली आवृत्ती, २००९, पृ.४८
17) ठाकुर भगवान, आंबेडकरी जलसे, सुगावा प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती, २००५, पृ. ४३६